साप्ताहिक

# हॅलो न्यूज

e-mail-hellonewskrd@gmail.com

संपादक : विशाल वामन पाटील

पोस्ट परवाना :
KRDDN/026/2026-28

HELLO NEWS

✲ सातारा ✲ वर्ष १ ✲ अंक १९ ✲ मराठी ✲ सोमवार १२ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर २०२६ ✲ PRGI. MHMAR/26/A3624 ✲ पाने ४ ✲ किंमत ३ रुपये

✲ Satara ✲ Year 1 ✲ Volume 19 ✲ Marathi ✲ Monday 12 October to 18 October 2026 ✲ PRGI. MHMAR/26/A3624 ✲ Page 4 ✲ Price 3 Rs.

## ज्ञानेश कुमार विरोधात आंदोलनाचा भडका

### नेत्यांची विमानातच धरपकड; दिल्लीत ७,००० जण ताब्यात; ..तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार!



**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीने शनिवारी जंतरमंतरवर सरकारचे बंदी आदेश धुडकावून जोरदार आंदोलन केले. देशभर सुरू असलेले हे आंदोलन दडपून टाकण्यासाठी पावले उचलणाऱ्या प्रशासनाने सीजेपीचे नेते अभिजीत दीपके, सौरभ दास आणि आशुतोष रांका यांना शनिवारी सकाळी नवी दिल्ली येथे उतरताच विमानातूनच ताब्यात घेतले. दरम्यान, या आंदोलनाला मुंबई, पुणे यासह अनेक ठिकाणी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच यापुढेही आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार सीजेपीने व्यक्त केला आहे.

त्याचप्रमाणे ध्रुव राठी यांच्यासह अनेक ज्येष्ठ राजकीय नेत्यांसह जवळपास ३००० हजारांहून अधिक जणांची धरपकड केली. त्यानंतर सीजेपीनेही आक्रमक भूमिका घेत आपल्या आंदोलनाची धार अधिक तीव्र करताना दीपके यांनी या कारवाईचे नेतृत्व अजिंक्य शिंदे यांच्याकडे सोपविले आणि त्याबाबतची घोषणा अगोदरच रेकॉर्ड केलेल्या व्हिडीओतून करण्यात आली. जंतरमंतर येथे जाताना वाटेत अडविण्यात आले तर तेच जंतरमंतर समजून आंदोलन सुरूच ठेवा, असे आवाहन शिंदे यांनी केले. गेल्या वेळी आंदोलन झाले तेव्हा देशाने एकत्र येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे गर्वहरण केले. यावेळी तसे होऊ नये यासाठी प्रशासनाने अनेक प्रतिबंधात्ममक उपाय योजले आहेत. त्यामुळे आता कितीही लोकांना ताब्यात घ्या, आम्ही उद्या पुन्हा येऊन आंदोलन करू, जोपर्यंत ज्ञानेशकुमार राजीनाम देत नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा निर्धार शिंदे यांनी व्यक्त केला. दरम्यान या कारवाईवर संताप व्यक्त करीत हा प्रकार आणीबाणीहून अधिक वाईट असल्याचा आरोप विरोधकांनी केला.

सीजेपीचे आंदोलन यशस्वी होऊ नये यासाठी शुक्रवारपासूनच अनेक रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या होत्या, दिल्लीतील मेट्रो स्थानके बंद करून इंटरनेट सेवाही ठप्प करण्यात आली होती. त्यामुळे मिळेल त्या मार्गान जंतरमंतर येथे पोहोचण्याचा प्रयत्न आंदोलक करीत असतानाच दुपारी १ वाजण्याच्या सुमारास आकाशवाणी भवनाजवळ बॅरिकेड्स ओलांडून काही आंदोलकांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांवर दगडफेक केली, ज्यात सहा पोलीस कर्मचारी जखमी झाले. यानंतर पोलिसांनी त्वरित कारवाई करत त्यांना ताब्यात घेतले. आंदोलनामुळे दिल्लीत ३०,००० हून अधिक पोलीस आणि निमलष्करी दल तैनात करण्यात आले होते. सुरक्षेचा भाग म्हणून ४५ मेट्रो स्टेशन बंद ठेवण्यात आली होती, तर सीमाभागांवर, रेल्वे स्थानकांवर आणि बस टर्मिनसवर कसून तपासणी करण्यात आली. जंतरमंतर परिसरात येणारे रस्ते बॅरिकेड्स लावून पूर्णपणे बंद करण्यात आले होते. काही रस्त्यांवर गाड्यांची जबरदस्तीने होणारी वाहतूक रोखण्यासाठी पोलिसांनी लोखंडी खिळेही (स्टील स्पाइक्स) लावले होते. निदर्शने करणाऱ्या छोट्या-छोट्या गटांना पोलिसांनी जंतरमंतर, कनॉट प्लेस आणि मिंटो ब्रिज परिसरातून ताब्यात घेतले.

**सहा पोलीस कर्मचारी जखमी**

निदर्शनांदरम्यान शनिवारी येथील आकाशवाणी जवळील इम्तियाज अली मार्गावर आंदोलकांनी बॅरिकेट्स तोडून सुरक्षा कर्मचाऱ्यांवर दगडफेक केली. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास २५ ते ३० आंदोलकांनी इम्तियाज अली मार्गावरील बॅरिकेट्स ओलांडून सुरक्षा कर्मचाऱ्यांवर दगडफेक केली. या घटनेत सहा पोलीस कर्मचारी जखमी झाले असून, काही आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.




## किसान मोर्चाच्या माध्यमातून शेतकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य : रामकृष्ण वेताळ

**कराड (हॅलो न्यूज)**

शेतकरी हा देशाचा कणा असून, किसान मोर्चाच्या माध्यमातून शेतकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळणे हे प्रत्येक पदाधिकाऱ्याचे भाग्य आहे. शासनाच्या शेतकरीहिताच्या योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी किसान मोर्चाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बूथ स्तरापर्यंत सक्रियपणे काम करावे, असे आवाहन महाराष्ट्र भाजप किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांनी केले.

भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाच्या सिंधुदुर्ग जिल्हा कार्यकारिणीची बैठक प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडली. यावेळी ते पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत होते.

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेल्या विविध निर्णयांची माहिती देताना वेताळ म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीसह अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेंतर्गत सुमारे ४० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी करण्यात आली आहे. किसान मोर्चाच्या मागणीला प्रतिसाद देत जुन्या कृषीपंपांची थकीत वीजबिले माफ करण्यात आली असून, साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांना वीजबिलातून सवलत देण्यात आली आहे. तसेच महिला शेतकऱ्यांना प्रमाणित ओळख देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्राने देशात पुढाकार घेतल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीदरम्यान किसान मोर्चाच्या जिल्हा कार्यकारिणीतील नवनियुक्त पदाधिकारी तसेच मंडल अध्यक्षांना प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांच्या हस्ते नियुक्तिपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रदेश सदस्य मोहन सावंत, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष उमेश सावंत, संघटक तथा जिल्हा भाजप उपाध्यक्ष प्रसन्न देसाई, किसान मोर्चाचे माजी अध्यक्ष अमृत चौगुले, गोसेवा आयोगाचे सदस्य दीपक भगत, सरचिटणीस महेश संसारे, ज्योती देसाई, प्रसाद भोजने, श्यामसुंदर राय, उपाध्यक्ष गुरुनाथ पाटील, अजय सावंत, दामोदर नारकर, कीर्तमंगल भगत यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, मंडल अध्यक्ष आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत मोहन सावंत, यशवंत पंडित, प्रसन्न देसाई, दीपक भगत आणि उमेश सावंत यांनीही मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सरचिटणीस महेश संसारे यांनी केले, तर शंकर तेजम यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने बैठकीची सांगता झाली.

## चेअरमन यशराज देसाई यांचा वाढदिवस विविध सामाजिक शैक्षणिक उपक्रमांनी साजरा

### पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांचेकडे मुख्यमंत्री सहायता निधीसाठी पाच लक्ष रुपयांचा धनादेश सुपुर्द



**पाटण (हॅलो न्यूज)**

महाराष्ट्र राज्याचे पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री तथा सातारा जिल्हयाचे पालकमंत्री ना.शंभूराज देसाई यांचे चिरंजिव व लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा. यशराज देसाई (दादा) यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवित साजरा करण्यात आला. श्रीमती विजयादेवी देसाई (मॉसाहेब), मंत्री ना. शंभूराज देसाई, सौ. स्मितादेवी देसाई, श्री. इंद्रजित निंबाळकर, डॉ. सौ. वैष्णवीराजे देसाई, कु.ईश्वरी देसाई यांनी मा. यशराज देसाई (दादा) यांना कोयना दौलत निवासस्थानी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

चेअरमन मा. यशराज देसाई (दादा) यांचा दि. १० ऑक्टोंबर रोजीचा वाढदिवस प्रतिवर्षी विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रमांनी साजरा करण्यात येतो. परंतू संपूर्ण महाराष्ट्रावर दुष्काळाचे संकट असून दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर दुष्काळ परिस्थितीमुळे सर्व सामान्य शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असल्याने दुष्काळग्रस्त भागातील अनेक कुटुंबांचा उदर निर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांचेकडे मा.यशराज देसाई दादा वाढदिवस नियोजन समितीच्यावतीने दुष्काळग्रस्त कुटुंबियांना मदतीचा हात म्हणून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी पाच लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला तसेच दुष्काळग्रस्त माण खटाव तालुक्यातील कुटुंबियांना संसार उपयोगी साहित्याचे किटचे वितरण करण्यात आले. तसेच शेंद्रे ता.जि.सातारा येथे एहसास मतिमंद मुलांचे वसतिगृहमधील मुलांना खाऊ वाटप व निसराळे फाटा येथे साहस मतिमंद मुलांचे वसतिगृह येथे मुलांसाठी आयोजित आरोग्य शिबीराचा शुभारंभ व आवश्यक साहित्याचे वितरण त्यांचे शुभहस्ते करण्यात आले.पाटण विधानसभा मतदारसंघामध्ये मा. यशराज देसाई (दादा) वाढदिवस नियोजन समिती यांचे वतीने पाटण विधानसभा मतदारसंघात विविध सामाजिक,शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पाटण विधानसभा मतदारसंघातील ५४२ जिल्हा परिषद शाळांमधील ९६४४ विध्यार्थांना शैक्षणिक सहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. मा.यशराज देसाई (दादा) यांनी पाटण तालुक्यातील पहिले शिवतिर्थ असलेल्या नाडे नवारस्ता येथील अखंड हिंदूस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याला अभिवादन करुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाडे येथील विद्यार्थ्यांना क्रिडा साहित्य वितरण केले. कारखाना कार्यस्थळ दौलतनगर ता.पाटण येथे आल्यानंतर लोकनेते बाळासाहेब देसाईसाहेब यांचे पुर्णाकृती पुतळयास अभिवादन करुन श्री गणेश मंदीर दौलतनगर येथे श्री गणरायाचे दर्शन घेऊन स्व.शिवाजीराव देसाई (आबासाहेब) यांचा पुतळा व समाधी या ठिकाणी पुष्पचक्र अर्पण करुन विनम्र अभिवादन केले. मरळी गावचे ग्रामदैवत श्री निनाई देवी दर्शन घेऊन या ठिकाणी मरळी ग्रामस्थांचेवतीने वाढदिवसाच्या निमित्ताने सत्कार समारंभ करण्यात आला.

कराड पंचायत समिती सदस्य दिनेश कुंभार, जिल्हा परिषद सदस्य अशोकराव पाटील, कु. मृणाल महेश पाटील, युवा उद्योजक सचिन पवार, मरळीचे माजी सरपंच प्रवीण पाटील, युवा नेते विक्रम पाटील उपस्थित होते.

संपादकीय

# ‘स्टॉकहोम सिंड्रोम’ग्रस्त समाज

स्टॉकहोम सिंड्रोम ही एक अशी मानसिक स्थिती आहे, जेव्हा ओलीस ठेवली गेलेली, छळलेली व्यक्ती तिच्या अपहरणकर्त्या व्यक्तीबद्दल विश्वास, निष्ठा किंवा आपुलकी विकसित करते. १९७३ साली स्टॉकहोम शहरातील एका बँकेवर पडलेल्या दरोड्याच्या वेळी दरोडेखोरांनी ज्या चार बँक कर्मचाऱ्यांना सहा दिवस ओलीस ठेवले होते त्यांच्या बदललेल्या मानसिक स्थितीचा अभ्यास करून स्टॉकहोम सिंड्रोम ही संकल्पना स्वीडिश मानसोपचार तज्ज्ञ आणि गुन्हेशास्त्रज्ञ निल्स बेजेरोट यांनी मांडली. या बदलाच्या परिणामी, दरोडा-नाट्य संपल्यावर ओलीस ठेवलेल्या बँक कर्मचाऱ्यांनी दरोडेखोरांविरुद्ध साक्ष देण्यास चक्क नकार दिला. एवढेच नाही, तर एका कर्मचाऱ्याने दरोडेखोरांची बाजू न्यायालयात मांडता यावी यासाठी निधी देखील उभारला होता. अपहरण प्रकरणातील काही अपहृत व्यक्ती स्टॉकहोम सिंड्रोमग्रस्त होऊ शकतात. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये भारतातील विशाल जनसमुदाय स्टॉकहोम सिंड्रोमग्रस्त झालाय की काय अशी शंका येते. यावर एक दृष्टिक्षेप टाकणे उद्बोधक ठरेल. स्टॉकहोम सिंड्रोम अजून ठळकपणे समजून घेण्यासाठी जगभर गाजलेल्या मनी हाइस्ट या बँक दरोड्याचे कथानक असलेल्या मालिकेतील मोनिका या ओलीस ठेवलेल्या बँक कर्मचारी पात्राचे उदाहरण योग्य ठरेल. तिच्याबाबत सहानुभूती दर्शविणाऱ्या डेन्व्हर नावाच्या एका दरोडेखोराच्या प्रेमात ती एवढी पडते की पुढे त्या टोळीत सामील होऊन स्टॉकहोम हे नाव धारण करते. कोणत्याही अपहरणकांडात ओलीस ठेवलेल्या लोकांवर अपहरणकर्त्यांची प्रचंड दहशत असते. त्यांनी ओलिसांना खायला-प्यायला दिले, थोडीशी सहानुभूती दाखवली तरी ओलिसांना ती कृती दयाळूपणाची वाटते. ओलिसांना वाटू लागते की आता हेच आपले तारणहार आहेत. मग, अपहरणकर्त्यांची बाजू अयोग्य, बेकायदेशीर असली तरी ओलीस ठेवलेल्यांना ती न्याय्य वाटू लागते. त्यांच्या तावडीतून सुटून पळून जायची संधी मिळाली तरी ते पळून जात नाहीत. तसेच त्यांच्या तावडीतून सोडवणाऱ्या सुरक्षा यंत्रणा त्यांना शत्रू वाटू लागतात. त्यांना असे वाटणे हे त्यांच्या ङ्गस्टॉकहोम सिंड्रोमफ्ग्रस्त होण्याचे लक्षण असते. मग अपहरणकर्त्यांनी केलेली गुन्हेगारी कृत्ये सुद्धा त्यांना न्याय्य वाटू लागतात.

भारतीय समाजातील काही कुटुंबांमध्ये या स्टॉकहोम सिंड्रोमची अनेक उदाहरणे आढळून येतात. आपल्या पतीने केलेला भयानक कौटुंबिक हिंसाचार सहन करून पत्नी भला है, बुरा है, जैसा भी है... या भावनेने त्या पतीची सेवा करत आपले आयुष्य रेटत राहते. कारण संस्कार, परंपरा, सामाजिक दडपण, परावलंबित्व यामुळे तिची मानसिक अवस्था ओलीस ठेवलेल्या व्यक्तीसारखी झालेली असते. यातून आता सुटका नाही अशी तिची खात्री झालेली असते. ती नवऱ्याशी जुळवून घेते. नवऱ्यावर कसलेही संकट आल्यास त्याला वाचवण्यासाठी ती प्राणपणाने प्रयत्न करते. तिला यातून बाहेर पडण्याची संधी आली तरी त्या संधीचा ती लाभ घेत नाही. शिक्षणामुळे, स्वतःच्या हक्कांची जाणीव झाल्यामुळे हे प्रकार कमी झाले असले तरी अशिक्षित, गरीब कुटुंबांमध्ये अशा अनेक स्टॉकहोम सिंड्रोमग्रस्त महिला आजही आढळून येतात. आपल्या देशातल्या राजकारणात गेल्या एक-दीड दशकात धार्मिक कट्टरतेने प्रवेश केल्यापासून धर्मांध पक्ष-संस्था-संघटनांनी विविध माध्यमांमधून गोबेल्स तंत्राने दुष्प्रचार करून बहुसंख्यांक धर्मीयांवर आपला धर्म नष्ट होण्याच्या मार्गावर आहे अशी जबरदस्त भीती घातली आहे. आपला धर्म नष्ट करण्यासाठी अन्य अल्पसंख्यांक धर्म जोरदार प्रयत्न करीत असल्याचा दावा करून त्यांच्याविरुद्ध एवढ्या प्रभावीपणे दुष्प्रचार करण्यात येत आहे की बहुसंख्यांक समाजात अल्पसंख्यांक धर्मांच्या लोकांविषयी प्रचंड भीती, घृणा आणि क्रोध निर्माण झाला आहे. आम्हीच तुमचे तारणहार आहोत असा दावाही हे धर्मांध करतात. हा दावा पटवून देण्यात ते एवढे यशस्वी झाले आहेत की बहुसंख्यांक समाजाला त्यांच्या कारवाया अयोग्य असल्या, बेकायदेशीर असल्या तरी न्याय्य वाटू लागल्या आहेत. हे लक्षण तर हा समाज स्टॉकहोम सिंड्रोमग्रस्त झाल्याचे दर्शक आहे. स्टॉकहोम सिंड्रोमग्रस्त झालेल्या या समाजाला मग अल्पसंख्यांकांचे मॉब लिंचिंग योग्य वाटते, ग्रॅहॅम स्टेन्स आणि त्यांच्या मुलांचा जिवंत जाळून केलेला खून न्याय्य वाटतो. अन्य धर्मीय महिलांवरील बलात्कारासारखे अत्याचारांचे गुन्हे आवश्यक वाटतात. अल्पसंख्यांक समुदायांवर टाकलेले सार्वत्रिक बहिष्कार योग्य वाटतात. त्यांच्या प्रार्थनास्थळासमोर धुडगूस घालणे धार्मिक परम कर्तव्य वाटते. त्यांच्या घरांवर, प्रार्थनास्थळांवर बुलडोझर चालवणे धर्मरक्षणाचे कार्य वाटते. ही सारी कृत्ये संवैधानिक मूल्यांना पायदळी तुडवणारी, देशाच्या ऐक्याला आणि एकात्मतेला छेद देणारी आणि अमानवी असली तरीही ती योग्यच आणि आवश्यक वाटतात आणि हे सारे करणारी शासन यंत्रणा आणि ती चालवणारे लोक आपले तारणहार वाटतात. देशाच्या कायद्यापेक्षा, देशापेक्षा मोठे वाटतात. या स्टॉकहोम सिंड्रोमने एवढी भयानक पातळी गाठलेली आहे की या समाजाला स्वतःचे हित-अहितही कळत नाही. देशासमोर उभे ठाकलेले आणि त्यांना प्रभावित करणारे महागाई, बेरोजगारी, आरोग्य सेवा, शिक्षण, वीज, पाणी, रस्ते इत्यादी जीवनावश्यक प्रश्नही दुय्यम किंवा अनावश्यक वाटत आहेत. देशाच्या सुरक्षेतली गफलत असो की देशाची ढासळती अर्थव्यवस्था, याबद्दल या लोकांना काहीही देणेघेणे नसते. एवढेच नाही, तर आपले मूलभूत अधिकार चिरडले जाताहेत याची जाणीवही त्यांना राहिलेली नाही. ते काहीही असो, अन्य अल्पसंख्यांक लोकांचे नाक ठेचले जात आहे ना, याचाच काल्पनिक आनंद त्यांना मोठा वाटतो. या प्रश्नांवर कोणी लक्ष वेधल्यास आणि आंदोलन केल्यास त्याला शत्रू, देशद्रोही मानण्यापर्यंत या स्टॉकहोम सिंड्रोमग्रस्त लोकांची मजल जाते. कारण मूलभूत प्रश्नांकडे लक्ष वेधणे हा प्रकार त्यांना आपल्या तारणहारा विरोधातील अपराध वाटतो. अशा परिस्थितीत अल्पसंख्यांक तरी मागे का राहतील. त्यांची लोकसंख्या अत्यल्प म्हणून त्यांच्या अस्तित्वाला मोठा धोका. मग त्यांचा धर्म देखील खतरे में है असा प्रचार त्यांनी सुरू केला आहे. बहुसंख्यांकांची सर्व कृत्ये त्यांच्या दाव्यास पुष्टीच देतात. मग त्यांच्यातही त्यांच्या धर्मांचे तारणहार निर्माण होत आहेत. त्यांचेही लक्ष मूलभूत प्रश्नांवरून वळवले जात आहे. कारण धर्मरक्षणापुढे ते प्रश्न फिके पडत आहेत. देशात लोकसंख्येने ८० टक्के असलेले, स्वातंत्र्यापासून सत्तेत असलेले, सर्व यंत्रणा आपल्या ताब्यात असलेले हे बहुसंख्यांक लोक केवळ १५ टक्के अल्पसंख्यांक धर्मीयांविषयी एवढी भीती बाळगतात असे उदाहरण जगात कोठेही आढळणार नाही. अगदी इथले बहुसंख्यांक लोक जेव्हा अन्य देशांचे अल्पसंख्यांक रहिवासी बनतात तेव्हा त्या सर्व देशांमध्ये त्यांचा धर्म सुरक्षित असतो. सर्व अधिकार ते उपभोगतात. अगदी त्या देशातले बहुसंख्यांक लोक भारतातील अल्पसंख्यांकांच्या धर्माचे असले तरीही. आखातातील इस्लामी देश असोत किंवा पश्चिमेकडील ख्रिश्चनबहुल देश असोत, तिथे या लोकांच्या धर्माला कसलाही धोका नसतो. हा प्रकार जातींमध्ये देखील झिरपलेला दिसत आहे. आपल्या जातीचे लोक धोक्यात आहेत. अन्य जातींकडून आपल्या जातीला धोका आहे, म्हणून कोणीतरी जातीचा कैवार घेतो. उदा. राजस्थानातली करणी सेना, बिहारमधील रणवीर सेना, इत्यादी. या सेना आपल्या जातीच्या रक्षणासाठी मोठ्या प्रमाणात हिंसाचार करायला मागेपुढे पाहत नाहीत. त्यांच्या जातीतले नेमस्त लोक त्यांना विरोध करायला धजावत नसल्याने त्यांच्या मागे फरफटत जातात. कारण ते स्टॉकहोम सिंड्रोमग्रस्त असतात. आपल्या देशातल्या या स्टॉकहोम सिंड्रोमचे देशाला भोगावे लागत असलेले परिणाम भयावह आहेत. सर्वात मोठा परिणाम म्हणजे भारतीय जनमानस, धर्म आणि जातींच्या आधारावर विभागले आहे. एकमेकांवर विश्वास राहिलेला नाही. आपल्या तारणहाराने केलेली हिंसक कृत्ये, विशेषतः महिलांवरील अत्याचार ही सामान्य बाब मानली गेल्याने आणि हिंसाचारास हिंसाचाराने उत्तर मिळण्याची शक्यता असल्याने देशासमोर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार आहे. देशाला यापासून वाचवायचे असेल तर धर्मांध प्रवृत्तींनी आपल्या राजकीय उद्दिष्टांपेक्षा देशाचे हित महत्त्वाचे मानून दुभंगलेली मने साधण्यासाठी व्यापक प्रयत्न केले पाहिजेत. समाजाला स्टॉकहोम सिंड्रोममधून बाहेर काढले पाहिजे. अन्यथा यातून देशाचे, जनतेचे जे नुकसान होणार आहे त्याबद्दल आपल्या पुढील पिढ्या आपल्याला कधीही माफ करणार नाहीत.

# कराडमध्ये सेवा ज्योती यात्रेतून राष्ट्रनिर्माणाचा संकल्प

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या लोकसेवेबद्दल कृतज्ञता

**कराड (हॅलो न्यूज)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून देशसेवेला दिलेल्या २५ वर्षांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, भारतीय जनता पार्टी कराड दक्षिणच्यावतीने सेवा ज्योती यात्रा उत्साहात काढण्यात आली. भाजपाचे जिल्हाध्यक्ष आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या यात्रेत, पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मलकापुरातील भाजपा कार्यालयापासून भारत माता की जय आणि वंदे मातरम्च्या जयघोषात या यात्रेला सुरुवात झाली. त्यानंतर ही यात्रा कोयना वसाहत (ता. कराड) येथील राजाभाऊ कोटणीस हॉलमध्ये पोहोचली. याठिकाणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संबोधन थेट प्रक्षेपणाद्वारे मोठ्या स्क्रीनवर दाखविण्यात आले. सेवा हीच राष्ट्रनिर्मितीची खरी शक्ती असून, जनसेवेतून देशाला अधिक सामर्थ्यवान बनविण्याचे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले. विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकारण्यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने योगदान द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी माध्यमांशी संवाद साधताना आमदार डॉ. भोसले म्हणाले, सेवा संकल्प अभियानांतर्गत गेले महिनाभर आम्ही



समाजातील विविध प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र प्रदेश भाजपने दिलेले विविध कार्यक्रम यशस्वीपणे राबविले आहेत. विकसित भारताच्या निर्मितीमध्ये सातारा जिल्हा सर्वपरीने आपले योगदान देईल, याची मला खात्री आहे.

यावेळी विकसित भारत घडविण्याची शपथ घेण्यात आली. तसेच मान्यवरांच्या हस्ते क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल विविध खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला माजी आमदार आनंदराव पाटील, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ, कराड पंचायत समिती सभापती नंदाताई यादव, सदस्य पैलवान धनंजय पाटील, अ‍ॅड. नरेंद्र नांगरे-पाटील, मलकापूरचे नगराध्यक्ष तेजस सोनावले, उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे, जिल्हा परिषद सदस्या प्रियांका साळुंखे, शैलजा शिंदे, कराडचे नगरसेवक शिवाजी पवार, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष पिनू जाधव, मंडल अध्यक्ष राजेंद्र यादव, प्रवीण साळुंखे, एकनाथ बागडी यांच्या पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेरे स्टेशन येथे ४५० जणांची मोफत आरोग्य तपासणी

## कृष्णा विश्व विद्यापीठाचे विश्वस्त विनायक भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त शिबीराचे आयोजन

**कराड (हॅलो न्यूज)**

कृष्णा विश्व विद्यापीठाचे विश्वस्त विनायक भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त कृष्णा विश्व विद्यापीठ व कृष्णा हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने शेरे स्टेशन येथील सद्गुरू प्राथमिक आश्रमशाळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसह परिसरातील ४५० नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

आरोग्य शिबिराचे उद्घाटन कराड पंचायत समितीच्या सभापती नंदाताई यादव यांच्या हस्ते झाले. यावेळी पंचायत समितीच्या उपसभापती अनिता वेताळ, जिल्हा परिषद सदस्या प्रियांका साळुंखे, पं. स. सदस्य वर्षा निकम, माधवी पाटसुपे, माजी सदस्य बाळासाहेब निकम, यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे संचालक बाजीराव निकम, कार्यकारी संचालक बाजीराव सुतार, कृष्णा विश्व विद्यापीठाचे उपकुलसचिव एस. ए. माशाळकर, जयवंत इंजिनियरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. अनंत गुजर, भाजपाचे मंडल अध्यक्ष शंकर निकम, शेरे गावच्या



सरपंच मनिषा शिरतोडे, माजी सरपंच संगीता निकम, कृष्णा बँकेचे संचालक नारायण शिंगाडे, अधिकराव निकम, समीर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, विनायक भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त वळसे येथील एहसास मतिमंद मुलांच्या वसतिगृहात मुलांसाठी जेवण, अन्नधान्य व अत्यावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी दत्तात्रय गणेशकर, दिलीप जाधव, रोहित पिसाळ, रमेश मंदिरे, अभिजीत कराळे, विनायक जाधव यांची उपस्थिती होती.

# सह्याद्रि कृषी महाविद्यालयात महात्मा गांधी जयंतीनिमित्त सेवा संकल्प अभियान व परिसर स्वच्छता मोहीम संपन्न

**कराड (हॅलो न्यूज)**

सह्याद्रि सहकारी साखर कारखाना संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्नित सह्याद्रि कृषी महाविद्यालय, यशवंतनगर (कराड) येथे राष्ट्रीय सेवा योजना मार्फत महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून सेवा संकल्प अभियान अंतर्गत महाविद्यालय परिसर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता मोहिमेची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील राठोड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष सरकाळे, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

* Satara * Vol- 19 * Isshu- 1 * Marathi * Weklly * Page- 4 * Prise Rs- 3/- * PRGI. MHMAR/26/A3624

साप्ताहिक हॅलो न्यूज (PRGI. MHMAR/26/A3624) हे मराठी पत्रक मालक, प्रकाशक, संपादक विशाल वामन पाटील यांनी मुद्रक सचिन काशिनाथ पाटील यांच्या राजमुद्रा ऑफसेट, २३३, सूर्या कॉम्प्लेक्स कराड, जि. सातारा येथे छापून (मुद्रीत) साप्ताहिक हॅलो न्यूज मुख्य कार्यालय २०६/१, वार्ड नं- ४, मु. पो तांबवे, ता. कराड, जि. सातारा ४१५११४ येथून प्रकाशित केला. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास कराड न्यायालया अंतर्गत)

Weekly Hello News publisher, Owner and Editor By Vishal Vaman patil has Printed Sachin kashinath Patil, Rajmudra offset, 233, Surya complex karad, Dist - Satara At published weekly Hello News Head office 206/1 ward no -4, At - Post Tambave, Tal - karad, Dist - Satara 415114

# ‘बापुजी’च्या जडणघडणीत शशिकांत पाटील यांचे योगदान मोलाचे

**प्रा. डॉ. विनोद बाबर; ‘प्रीतिसंगम’च्या माध्यमातून पत्रकारितेतही ठसा, सेवापूर्तीनिमित्त सपत्नीक सत्कार**



**कराड (हॅलो न्यूज)**

डॉ. बापुजी साळुंखे महाविद्यालयाच्या जडणघडणीच्या विविध टप्प्यांचे साक्षीदार राहून तब्बल ३७ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावणारे वरिष्ठ लिपिक शशिकांत पाटील यांनी महाविद्यालयाला पंढरपूर आणि स्वत:ला सावता माळी मानून कार्य केले. त्यांच्या या प्रदीर्घ, निष्ठावान आणि सर्वसमावेशक सेवेमुळे ते अजातशत्रू व्यक्तिमत्त्व ठरले असून, महाविद्यालयाच्या जडणघडणीत शशिकांत पाटील यांचे योगदान मोलाचे आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या इतिहासात त्यांच्या कार्याची नोंद निश्चितच घेतली जाईल, असे गौरवोद्गार प्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ. विनोद बाबर यांनी काढले.

डॉ. बापुजी साळुंखे महाविद्यालय, कराड येथे शशिकांत पाटील यांच्या सेवापूर्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. बाबर बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश घाटगे होते. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष तथा पत्रकार प्रमोद सुकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. सतीश घाडगे यांनी, शशिकांत पाटील यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या उपस्थितीत यशवंतराव चव्हाण स्मृती सदन येथे कार्यक्रम घेण्याची तयारी केली होती. मात्र, पाटील यांनी जाहीर कार्यक्रमास नकार दिल्याने महाविद्यालयातच कार्यक्रम घेण्याचे निश्चित करण्यात आले. डॉ. बापुजी साळुंखे यांच्या विचार व तत्त्वांनुसार जाहीर कार्यक्रम घेण्याचे ठरविल्याचे डॉ. घाटगे यांनी सांगितले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते शशिकांत पाटील यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. पत्रकार, तसेच काले ग्रामस्थांच्या वतीनेही त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात प्रा. ए.जी. थोरात, प्रा. एस.एम. पाटील, प्रा.डॉ. मारुती सूर्यवंशी, प्रा. सुरेश राजपूत, तसेच पत्रकार संभाजी थोरात, प्रमोद तोडकर आणि सचिन शिंदे यांनी मनोगत व्यक्त करून शशिकांत पाटील यांच्या कार्याचा गौरव केला.

## येरफळे येथे श्री वाघजाईदेवी नवरात्र उत्सव निमित्ताने कीर्तन महोत्सवाचे आयोजन

**येरफळे (हॅलो न्यूज)**

पाटण तालुक्यातील येरफळे येथील श्री वाघजाईदेवी मंदिरामध्ये श्री वाघजाईदेवी नवरात्र उत्सव निमित्ताने कीर्तन महोत्सवाचे आयोजन सालाबादप्रमाणे करण्यात आले आहे. यंदा या महोत्सवाचे १६ वे वर्ष आहे. हा महोत्सव रविवार, १० ऑक्टोबर २०२६ ते मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत संपन्न होत आहे.




महोत्सवादरम्यान दररोज विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या नवरात्र उत्सव निमित्ताने ह.भ.प.कु. भक्तीताई साळुंखे (नागठाणे-सातारा), ह.भ.प. सुशांत घोरपडे (खोजेवाडी-सातारा), ह.भ.प.कु. आराध्या कदम (बाल कीर्तनकार, विंग), ह.भ.प. बबनराव कदम (हिंगणगाव, सांगली), ह.भ.प. लक्ष्मण नलवडे, सर्जापूरकर (जावळी), ह.भ.प. संजय कवर (कवरवाडी-मुळगाव), ह.भ.प. बाबुराव भोसले (धामणीकर), ह.भ.प. सौ. धनश्री देसाई (बोर्गे, मुंबई), ह.भ.प. बाळकृष्ण गोगावले (पुणे शिंदेवाडी)

तसेच होमहवन व महाप्रसाद यांचे आयोजन श्री. वाघजाईदेवी विकास प्रतिष्ठान येरफळे यांच्या वतीने करण्यात आले असून, असून सर्व भाविक भक्तांनी यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त ग्रामस्थ, तरुण मंडळ आणि भक्त मंडळ, येरफळे व श्री.वाघजाईदेवी विकास प्रतिष्ठान येरफळे यांच्याकडून करण्यात आले आहे.

## उत्कृष्ट पोलीस पाटील गौरव : सुपने येथील कमलेश कोळी यांचा आयजीच्या हस्ते सन्मान

**सातारा (हॅलो न्यूज)**



पोलीस प्रशासनाशी समन्वय साधत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच समाजहितासाठी उल्लेखनीय व कर्तव्यदक्ष कामगिरी केल्याबद्दल कराड तालुक्यातील दोन पोलीस पाटलांचा उत्कृष्ट पोलीस पाटील म्हणून गौरव करण्यात आला. वाठार येथील ज्योती प्रवीण शिंदे आणि सुपने येथील कमलेश विष्णू कोळी यांची वर्ष २०२५–२६ साठी कराड तालुक्यातून उत्कृष्ट पोलीस पाटील म्हणून निवड झाली.

सातारा येथे झालेल्या कार्यक्रमात कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा यांच्या हस्ते दोघांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर, कराडच्या राजश्री पाटील, कराड शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे, कराड तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार कोल्हाळ, खंडाळ्याचे पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी व पोलीस पाटील उपस्थित होते. या सन्मानाबद्दल कराड तालुक्यातील पोलीस पाटील बांधवांकडून दोघांचे अभिनंदन करण्यात आले.

## कुंचल्यातून कलाकार घडविणारा कलावंत शिक्षक श्री. अमर भागवत सर

शिक्षक म्हणजे केवळ चार भिंतींच्या वर्गात धडे देणारी व्यक्ती नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या मनातील सुप्त गुणांना ओळखून त्यांना योग्य दिशा देणारा शिल्पकार असतो. कुणाच्या शब्दांना वाचा फोडतो, कुणाच्या बुद्धीला चालना देतो, तर कुणाच्या हातातील कुंचल्याला स्वप्नांचे रंग देतो. अशाच कलेशी मनापासून नाते जोडलेल्या आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आकार देणाऱ्या शिक्षकांमध्ये कै. ज्ञानोजीराव साळुंखे हायस्कूल, पाटण येथील कलाशिक्षक श्री. अमर भागवत सर यांचे नाव आदराने घ्यावे लागेल.

कला हा विषय शिकवता येतो; पण कलेची दृष्टी निर्माण करता येणे ही खरी कसोटी असते. भागवत सरांनी ही दृष्टी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचे काम सातत्याने केले आहे. त्यांच्या हातातील कुंचला जेव्हा कागदावर फिरतो, तेव्हा केवळ रंगांची उधळण होत नाही, तर त्यातून एखादी भावना, एखादा विचार आणि एखादे स्वप्न आकार घेत असते. हाच अनुभव ते आपल्या विद्यार्थ्यांना देतात.



विद्यार्थ्यांच्या हातात पेन्सिल आली की त्यांना फक्त चित्र काढायला सांगणे सोपे आहे; मात्र त्या चित्रामागची कल्पना समजून घेणे, विद्यार्थ्यांच्या मनातील कलाकार शोधणे आणि त्याला प्रोत्साहन देणे यासाठी शिक्षकाच्या मनात कलेबरोबरच विद्यार्थ्यांविषयी अपार जिव्हाळा असावा लागतो. भागवत सरांच्या कार्यात हा जिव्हाळा प्रकर्षाने जाणवतो.

एखादा विद्यार्थी पहिल्यांदा चित्र काढताना रेषा वाकडीतिकडी काढतो. रंग चित्राच्या चौकटीबाहेर जातो. प्रमाण चुकते. पण अशा वेळी इथे चुकलेफअसे म्हणण्याऐवजी इथुन प्रयत्न करफ हा आत्मविश्वास देणारा शब्द विद्यार्थ्याला पुढे घेऊन जातो. भागवत सरांची शिकवण्याची पद्धतही विद्यार्थ्यांच्या या आत्मविश्वासाला बळ देणारी आहे. चूक ही अपयश नसून शिकण्याची पहिली पायरी आहे, हा संस्कार त्यांच्या कलाशिक्षणातून विद्यार्थ्यांना मिळतो.

शासकीय रेखाकला ग्रेड परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण मिळावे, त्यांच्या निरीक्षणशक्तीला चालना मिळावी आणि त्यांच्या कलागुणांना व्यापक व्यासपीठ मिळावे, यासाठी ते प्रयत्नशील असतात. चित्रकला, रेखाटन, हस्तकला, विविध शालेय उपक्रमांची सजावट अशा अनेक माध्यमांतून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा, यासाठी त्यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरते.

आज मोबाईलच्या पडद्यावर रंग आणि चित्रे पाहण्याची सवय वाढत असताना स्वत:च्या हाताने चित्र काढण्याचा आनंद अनेक मुलांपासून दूर जात आहे. अशा काळात विद्यार्थ्यांच्या हातात पुन्हा पेन्सिल, रंग आणि कुंचला देण्याचे काम करणारे कलाशिक्षक समाजासाठी निश्चितच मोलाचे आहेत. कारण चित्र काढताना मुलाचे केवळ हात काम करत नसतात; त्याचे मन विचार करत असते, डोळे निरीक्षण करत असतात आणि कल्पनाशक्ती नव्या जगाची निर्मिती करत असते. भागवत सरांच्या कार्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते विद्यार्थ्यांना कलेतून संवेदनशील बनवण्याचा प्रयत्न करतात. निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी, समाजातील वास्तव समजून घेण्याची जाणीव, सौंदर्याची जाण आणि कल्पनाशक्तीचा विकासया सगळ्यांचा संगम त्यांच्या कलाशिक्षणात दिसून येतो. खऱ्या शिक्षकाची ओळख त्याने किती धडे शिकवले यावर होत नाही, तर त्याने किती विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा दिली यावर होते. भागवत सरांच्या हातून घडणारा प्रत्येक विद्यार्थी हा त्यांच्या कार्याचा जिवंत पुरावा आहे. एखाद्या विद्यार्थ्याच्या चित्रात दिसणारा सुंदर रंग, आत्मविश्वासाने काढलेली रेषा किंवा स्पर्धेत मिळालेले यश पाहून शिक्षकाच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे. कुंचला त्यांच्या हातात असला, तरी रंग विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना मिळतात. कागद विद्यार्थ्यांसमोर असला, तरी त्यावर उमटणाऱ्या रेषांमध्ये त्यांच्या मार्गदर्शनाचा ठसा असतो.

म्हणूनच श्री. अमर भागवत सर हे केवळ कलाशिक्षक नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला पंख देणारे आणि त्यांच्या स्वप्नांना रंग देणारे कलागुरू आहेत. त्यांच्या कुंचल्यातून चित्रे साकारत राहोत आणि त्यांच्या मार्गदर्शनातून अनेक विद्यार्थी उद्याचे उत्तम कलाकार घडोत, हीच त्यांच्या कार्याला मनापासून शुभेच्छा!

**– संकलन व शब्दांकन**
**श्री. संतोष कदम सर,**
**उप शिक्षक शिवाजीराव देसाई विद्यालय सोनवडे**



## ग्रँड पृथ्वी मेडिकल फाउंडेशनच्या संचालकपदी मुकेश मोहिते यांची नियुक्ती

**कराड (हॅलो न्यूज)**

भारत सरकार मान्यताप्राप्त पुणेस्थित ग्रँड पृथ्वी मेडिकल फाउंडेशनच्या संचालकपदी कराडचे मुकेश मोहिते यांची संस्थेच्या वतीने नियुक्ती करण्यात आली. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस, राज्याचे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक चंद्रशेखर दैठणकर आणि संस्थेचे अध्यक्ष उमेश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत मोहिते यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

या नियुक्तीबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना मुकेश मोहिते म्हणाले, ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानासोबतच सामाजिक बांधिलकीची एक मोठी संधी आहे. संस्थेच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रमांना अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी तसेच रुग्णांचे हक्क, आरोग्यविषयक जनजागृती आणि सामाजिक कार्याच्या क्षेत्रात योगदान देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. संस्थेने माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे.

ग्रँड पृथ्वी मेडिकल फाउंडेशनच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त पुणे येथे आयोजित सर्वसाधारण सभेत ही नियुक्ती करण्यात आली. यावेळी फाउंडेशनच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाची नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमास भानुप्रताप बर्गे, डॉ. अविनाश भोंडवे, डॉ. श्रीपाल सबनीस, उमेश चव्हाण, डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण, चंद्रशेखर दैठणकर, मिलिंद गायकवाड, जानमहम्मद पठाण, अपर्णा मारणे-साठे, मुकेश मोहिते उपस्थित होते.

## कराडात दुर्गामाता दौडचे आयोजन

**कराड (हॅलो न्यूज)**

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, कराड यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे घटस्थापनेपासून दसऱ्यापर्यंत दुर्गामाता दौड आयोजित करण्यात आली आहे. दररोज पहाटे ५.३० वाजता विविध ठिकाणाहून दौड सुरू होऊन कराड शहर व परिसरातील विविध देवी मंदिरांत दर्शन घेण्यात येणार आहे. या दौडमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येकाने डोक्यावर भगवा फेटा किंवा पांढरी टोपी घालून श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे धारकरी, युवक, युवती, महिला, पुरुष नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, कराड यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# ‘स्पंदन’ कडून विचारांची देवाणघेवाण आणि सेवाभावी कार्याचा सन्मान : महंत आहिल्यागिरीजी महाराज

**तळमावले (हॅलो न्यूज)**

एखाद्या व्यक्तीचे खरे मोठेपण त्याच्या मृत्यूनंतरही लोक किती आठवतात आणि त्याच्या कार्याचा वारसा कसा पुढे चालवतात, यातच असते, स्व.राजाराम डाकवे (तात्या) यांनी समाजात जे मोलाचे कार्य केले, ते आपल्या सर्वांसाठी कायम प्रेरणादायी असल्याचे मत महंत अहिल्यागिरीजी महाराज (शिवदत्त मठ, कापसेवाडी) यांनी व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर संभाजीराव पाटणकर (सेवानिवृत्त पोलीस अधिकारी), प्रदीप कांबळे (वक्ते/लेखक/कवी), डॉ. राजेंद्र कंटक (गिनीज बुक रेकॉर्ड होल्डर), विशाल पाटील (सातारा जिल्हा प्रतिनिधी, न्यूज १८ मराठी), अमित देशमुख (उपविभागीय डाक अधिकारी, कराड पूर्व उपविभाग), गयाबाई डाकवे, डॉ. संदीप डाकवे आदी मान्यवर उपस्थित होते

साहित्य आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववानांचा गौरव करण्यासाठी स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट, महाराष्ट्र राज्य, डाकवे परिवार आणि स्पंदन एक्सप्रेसच्या सहकार्याने स्व. राजाराम डाकवे (तात्या) यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले




होते.

महंत अहिल्यागिरीजी महाराज पुढे बोलताना म्हणाल्या की, माणूस जन्माला येतो आणि एक दिवस निघून जातो, परंतु ज्याने जन्माला येऊन समाजासाठी काहीतरी चांगले कार्य केले, त्याचे नाव कायमस्वरूपी अजरामर राहते. संत महात्मे आणि समाजसुधारकांनी आपल्याला नेहमीच परोपकाराचा आणि कष्टाचा मार्ग दाखवला असून त्यांची शिकवण हीच आपली खरी ताकद आहे.

आजचा हा सोहळा केवळ पुरस्कार वितरणाचा नसून विचारांची देवाणघेवाण करण्याचा आणि चांगल्या कामांना प्रोत्साहन देण्याचा एक उत्तम मंच आहे, असे त्यांनी नमूद करत समाजातील प्रत्येक घटकाने एकत्र येऊन सामाजिक कार्यात हातभार लावला पाहिजे आणि एकमेकांना मदत करत पुढे गेले पाहिजे, असा संदेश दिला.

यावर्षीचा प्रथम वर्षाचा स्व.राजाराम डाकवे (तात्या) सामाजिक कृतज्ञता पुरस्कार शिवसमर्थ समूहाचे कुटुंबप्रमुख ॲड.जनार्दन बोत्रे यांना देण्यात आला, पुरस्काराला उत्तर देताना ते म्हणाले की, सदर पुरस्कार दिल्याबद्दल मी डाकवे परिवाराचे आभार व्यक्त करतो. डाकवे परिवाराच्या वतीने सुरू असलेल्या या सामाजिक व साहित्यिक उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. आजच्या तरुणांनी केवळ स्क्रीनवर वेळ न घालवता पुस्तकांशी नाते जोडावे, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टच्या विविध सामाजिक कार्याचे आणि उपक्रमाचे विशेष कौतुक करत आज कार्यक्रमाला पुण्यवान लोकं भेटलीत, त्यांना भेटण्याची संधी दिल्याबद्दल आयोजकांचे आभार आणि तुमच्या या पुढच्या कार्याला शुभेच्छा देतो, असे विशाल पाटील यांनी आपल्या मनोगतात म्हटले.

याप्रसंगी राज्यस्तरीय स्व.राजाराम डाकवे (तात्या) सामाजिक कृतज्ञता पुरस्कार, स्व.राजाराम डाकवे (तात्या) साहित्य पुरस्कार, स्व.राजाराम डाकवे (तात्या) पारितोषिक, स्व.राजाराम डाकवे तात्या स्मृती सर्वोत्कृष्ट वाचनालय पुरस्कार, तात्याश्री दिवाळी अंक स्पर्धेतील विजेते, सेल्फी विथ गुढी स्पर्धेतील विजेते यांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात करताना स्व.राजाराम डाकवे (तात्या) यांच्या प्रतिमेचे पूजन करुन आणि दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.ए.बी.कणसे, आभारप्रदर्शन प्रा.दादाराम साळुंखे यांनी तर सुत्रसंचालन माधुरी सावंत-भोसले यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भरत डाकवे, प्रथमेश डाकवे, पौर्णिमा डाकवे, जीवन काटेकर, विकास साळुंखे, आशा मुटल, सुनील मुटल, रत्नाबाई काळे, भिमराव धुळप, डाकवे व समस्त डाकवे परिवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री कालिकादेवी पतसंस्थेचा १५ टक्के लाभांश जाहीर : चेअरमन राजन वेळापुरे

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड येथील श्री कालिकादेवी नागरी सहकारी पतसंस्थेला ३९ वर्षाची उज्वल परंपरा आहे. संस्थेने कराड व सातारा शाखेच्या माध्यमातुन ३१७ कोटीचा एकत्रित व्यवसाय करुन प्रगतीचे पुढचे पाऊल टाकले आहे. संस्थेने निव्वळ चे प्रमाण शुन्य टक्के राखण्यात यश मिळविले आहे. संस्थेने स्थापनेपासून अ वर्ग मिळवण्याची परंपरा या वर्षीही चालू ठेवली आहे. या आर्थिक




वर्षात ३ कोटी ७५ लाखावर नफा झाला असुन सभासदांना संस्था सातत्याने ३३ वर्षे १५% लाभांश देत आली आहे. यावर्षीही संस्थेने १५% लाभांश जाहिर केला आहे असे प्रतिपादन संस्थेचे चेअरमन राजन वेळापुरे यांनी केले.

**पतसंस्थेची ३९ वी वार्षिक सभा**

कृष्णाबाई प्रीतिसंगम सांस्कृतिक केंद्र नविन येथे संस्थेच्या ३९ व्या वार्षिक सर्व साधारणसभेत ते बोलत होते. श्री कालिका कुटुंब प्रमुख मुनीर बागवान सावकार, डॉ.संतोष मोहिरे, अरुण जाधव, व्हा. चेअरमन अनिल सोनवणे, राजेंद्रकुमार यादव, प्रा. अशोक चव्हाण, कार्यलक्षी संचालक विवेक वेळापुरे, श्रीमती जयाराणी जाधव, सीमा विभुते व संचालक व्यासपीठावर उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी प्रा.अशोक चव्हाण यांनी प्रास्ताविक करुन दिवंगतांना आदरांजली वाहिली. विवेक वेळापुरे, मुनीर बागवान सावकार, डॉ. संतोष मोहिरे, अरुण जाधव, राजेंद्रकुमार यादव, शरदचंद्र देसाई, अनिल सोनवणे, निरंजन मोहिरे यांनी विषय पत्रिकेप्रमाणे ठराव सभेसमोर मांडले. जयाराणी जाधव यांनी आभार मानले. संस्थेचे संस्थापक संचालक माजी चेअरमन डॉ. संतोष लक्ष्मणराव मोहिरे, दप्तरी शिपाई सर्जेराव आकाराम घारे यांच्या ३८ वर्षाच्या अखंड सेवेबद्दल तसेच कार्यलक्षी संचालक विवेक पद्मराज वेळापुरे यांच्या ३६ वर्ष सेवेबद्दल विशेष गौरव करण्यात आला.

संस्थेचे सभासद व कायदेशीर सल्लागार अँड. सौ. ज्योती दिपक मोहिरे (तवटे), प्राचार्य धनाजीराव बळवंतराव देसाई व प्रा. डॉ. विलास सखाराम सुर्वे घारेवाडी यांचा सभेत विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. सभेस संस्थापक संजीव मोहिरे, संचालक सुरेश भंडारी, डॉ.जयवंत सातपुते, सुरेश कोळेकर,संचालिका सौ.सीमा विभुते, सातारा शाखा सल्लागार औदुंबर कासार, मारुती सावंत, किरण लखापती, संतोष भामरे, शिरिष गोडबोले (सीए), राजेंद्रकुमार साठे(संगणक सल्लागार), व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कराडमध्ये रंगणार शारदीय व्याख्यानमालेचा वैचारिक जागर

**कराड (हॅलो न्यूज)**

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून कराड नगरपालिका नगरवाचनालयाच्या वतीने यंदाची शारदीय व्याख्यानमाला-२०२६ आयोजित करण्यात आली आहे. रविवार, दि. ११ ऑक्टोबर ते सोमवार, दि. १९ ऑक्टोबरदरम्यान यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन (टाऊन हॉल) येथे दररोज सायंकाळी ६.३० वाजता ही व्याख्याने होणार आहेत. सामाजिक, पर्यावरण, प्रशासन, संरक्षण, सायबर सुरक्षा, मानसशास्त्र आणि साहित्य अशा विविध विषयांवर मान्यवर वक्ते विचार मांडणार असल्याने कराडकरांना वैचारिक मेजवानी मिळणार आहे.

सोमवारी (दि. १२) मानसशास्त्रज्ञ व समुपदेशक डॉ. सोनाली खाडे शोध मनाच्या अस्तित्वाचा या विषयावर मार्गदर्शन करतील. मंगळवारी (दि. १३) सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक तुषार चव्हाण सह्याद्री व्याघ्र प्रकल्प - वाघांचे पुनरागमन या विषयावर व्याख्यान देणार आहेत.

तसेच बुधवारी (दि. १४) सामराज अकॅडमी, पुणेचे व्यवस्थापकीय संचालक सेवानिवृत्त कर्नल समीर कुलकर्णी संरक्षण दलातील संधी व आव्हाने या विषयावर मार्गदर्शन करतील. गुरुवारी (दि. १५) प्रसिद्ध व्याख्याते प्रा. युवराज पाटील (कोल्हापूर) आनंदाचा पासवर्ड या विषयावर श्रोत्यांशी संवाद साधतील. शुक्रवारी (दि. १६) सायबर तज्ज्ञ डॉ. धनंजय देशपांडे (पुणे) सायबर क्राईमचा धोका वेळीच ओळखा या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तर शनिवारी (दि. १७) महाराष्ट्र राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे संवाद तरुणाईशी या विषयावर संवाद साधणार आहेत. रविवारी (दि. १८) प्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ. सुरज चौगुले (वारणानगर, जि. कोल्हापूर) घराला घरपण देणारी नाती या विषयावर विचार मांडतील. व्याख्यानमालेचा समारोप सोमवारी (दि. १९) प्रसिद्ध कवी डॉ. स्वप्नील चौधरी (पुणे) यांच्या कवितेच्या निमित्ताने या विषयावरील व्याख्यानाने होणार आहे.

विविध क्षेत्रांतील अनुभवसंपन्न वक्त्यांच्या सहभागामुळे यंदाची शारदीय व्याख्यानमाला विचारांची विविधता आणि विषयांची व्यापकता यांमुळे विशेष ठरणार आहे. कराड व परिसरातील जाणकार रसिक श्रोते, नागरिक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या व्याख्यानांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कराड नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष तथा शिक्षण समितीचे सभापती प्रतापराव साळुंखे, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांनी केले आहे.

# कराड बाजार समितीच्या वार्षिक सभेत विकासकामांच्या ठरावांना मंजुरी,व्यापारी संकुल उभारणीसही हिरवा कंदील

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड शेती उत्पन्न बाजार समितीच्या विकासाला आणखी गती देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत, उंब्रज उपबाजार आवारातील जुनी कार्यालयीन इमारत पाडून त्या ठिकाणी सुसज्ज नवीन इमारत व व्यापारी संकुल उभारण्याचा ठराव वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला. तसेच मसूर उपबाजार आवारातील खुल्या जागेत पेट्रोल पंप आणि व्यापारी संकुल उभारण्याच्या प्रस्तावालाही सभेने मंजुरी दिली.




कराड येथील मार्केट यार्ड व्यापारी असोसिएशनच्या हॉलमध्ये बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.कोयना सहकारी बँकेचे संचालक व युवानेते आदिराज पाटील, रयत संघटनेचे कार्याध्यक्ष प्रा. धनाजी काटकर, सभापती सतीश इंगवले, उपसभापती नितीन ढापरे यांच्यासह संचालक मंडळाची प्रमुख उपस्थिती होती.

उंब्रज उपबाजार आवारातील विद्यमान कार्यालयीन इमारत जुनी व कालबाह्य झाल्याने ती पाडून त्याठिकाणी सुसज्ज नवीन कार्यालयीन इमारत तसेच व्यापारी संकुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. या माध्यमातून उपबाजार आवारातील कामकाज अधिक सुसूत्र होण्यासह व्यापारी व शेतकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध होणार आहेत.मसूर उपबाजार आवारातील उपलब्ध खुल्या जागेचा विकासात्मक वापर करण्यासाठी पेट्रोल पंप आणि व्यापारी संकुल उभारण्याच्या प्रस्तावावरही सभेत चर्चा झाली. उपस्थितांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली. बाजार समितीच्या मालमत्तेचा अधिक परिणामकारक वापर करून उत्पन्नाचे स्रोत वाढविण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

सभेला खरेदी-विक्री संघाचे चेअरमन अनिल मोहिते, व्हा. चेअरमन जगन्नाथ मोरे, कोयना दूध संघाचे उपाध्यक्ष शिवाजीराव जाधव, कोयना सहकारी बँकेचे चेअरमन के. टी. पाटील, व्हा. चेअरमन साहेबराव शेवाळे, कोयना वाहतूक संस्थेचे चेअरमन तुकाराम पाटील, शामराव पाटील पतसंस्थेचे चेअरमन शहाजीराव शेवाळे यांच्यासह बाजार समितीचे संचालक प्रकाश पाटील, संभाजी चव्हाण, संभाजी काकडे, जे. बी. लावंड, मनुभाई पटेल, दयानंद पाटील, मानसिंगराव जगदाळे, सर्जेराव गुरव, उद्धव फाळके, सोमनाथ जाधव, राजेंद्र चव्हाण, गणपत पाटील तसेच तालुक्यातील पदाधिकारी, शेतकरी, मतदार, आडते, व्यापारी, हमाल-मापाडी उपस्थित होते.

सभेचे सूत्रसंचालन राजेंद्र जाधव यांनी केले. सभेचे प्रास्ताविक सभापती सतीश इंगवले यांनी केले, तर प्रभारी सचिव आबासो पाटील यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. उपसभापती नितीन ढापरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सभा यशस्वी करण्यासाठी बाजार समितीचे अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.